# महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग

## राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,

सत्यमेव जयते

डॉ. नायडू रुग्णालय आवार,राजा बहादूर मिल मार्ग, पुणे -४११ ००१

| | | |
|---|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेव (आ.मा.जी.आ.) तथा उपमुख्य निबंधक (जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य | कार्यालय ☎ | :०२० - २६०५९५३० |
| | मा.सं. विभाग ☎ | :०२० - २६०५८६१० |
| | कक्ष-८१ | :०२० - २६०५८२९२ |
| | ई-मेल | crs_d83@yahoo.com |
| | संकेतस्थळ | arogya.maharashtra.gov.in |


**आरोग्य सेवा**

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८१,८२,८३ 9922-9967/१९

दिनांक:- ०४/०९/२०१९

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी

जिल्हा परिषद.....(सर्व)

विषय :- जन्म-मृत्यू कार्यक्रमाच्या प्रगतीचा आढावा घेणेबाबत.

संदर्भ :- मा.आयुक्त आरोग्य सेवा यांचे पत्र जा.क्र. राआअ/आढावा/कार्यक्रम प्रगती/५३१२४-१२५/ २०१९ दि.२७.०८.२०१९

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये मा. आयुक्त आरोग्य सेवा यांनी नियमित आढावा घेऊन व वेळोवेळी सूचना देऊनही विविध आरोग्य कार्यक्रमात अपोक्षित प्रगती निदर्शनास येत नसल्याने तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच कामकाजातील दिरंगाई व चालढकलपणासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारणमिमांसा विचारण्यांचे निर्देश दिले आहेत.

या अनुषंगाने जन्म-मृत्यू, विवाह नोंदणी, मृत्यूच्या कारणांचे सर्वेक्षण (ग्रामिण) या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावर खालील प्रमाणे कार्यवाही अपेक्षित आहे.

१. कार्यक्रमा अंतर्गत मासिक/ वार्षिक अहवाल वेळेवर सादर करणे.

२. कार्यक्रमा अंतर्गत विविध निर्देशकांचे कार्य अपेक्षित पातळीनुसार होण्यासाठी पाठपुरावा करणे.

३. जिल्हा, तालुका व आरोग्य संस्था स्तरावर होणाऱ्या सभांमध्ये जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी कार्य प्रगतीचा नियमित आढावा घेणे.

(कृ.मा.प.)

४. जिल्हास्तरावरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या क्षेत्रभेटीत जन्म-मृत्यू कार्यक्रमाचा आढावा घेऊन योग्य मार्गदर्शन करणे व भेटीचा अहवाल या कार्यालयास सादर करणे.

५. या कार्यालयामार्फत कार्याक्रमाच्या अनुषंगाने पाठविण्यात आलेल्या परिपत्रकांसंदर्भात पाठपुरावा करणे व कार्यावाही करणे.

६. कार्यक्रमांतर्गत प्रलंबित कार्यवाही/ अहवाल संदर्भात या कार्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार विहित कालावधीत कार्यवाही करणे.

उपसंचालक आरोग्य सेवा
(आ.मा.जी.आ.) तथा
उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत सस्नेह** :- उपसंचालक आरोग्य सेवा परीमंडळ कार्यालये (सर्व) ....यांना पाठपुराव्यास्तव.

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर</u>**

१.मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

२.मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यू महाराष्ट्र राज्य, मुंबई

३.मा.संचालक आरोग्य सेवा, मध्यवर्ती इमारत पुणे.